# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## हरवलेल्या ३.५ तोळे सोन्याचे दागिने परत मिळाले

## मेट्रो अधिकाऱ्यांच्या अतिरिक्त प्रयत्नांमुळे दागिना परत मिळाला



नागपूर: आपले अमूल्य दागिने परत मिळण्याची आशा त्यांनी पूर्णपणे सोडून दिली होती. दागिन्याची किंमत केवळ आर्थिक नव्हे, तर त्याच्याशी जोडलेल्या भावनिक मूल्यामुळे अधिक होती. गंगौर रेस्टॉरंट साखळीच्या मालक सौ. शशिदेवी मोहता यांना मेट्रो अधिकाऱ्यांचा फोन आला आणि ३.५

तोळे वजनाचा सोन्याचा दागिना घेण्यासाठी मेट्रो स्थानकावर येण्याची विनंती करण्यात आली, तेव्हा त्यांना यावर विश्वासच बसला नाही.

सौ. मोहता रहाटे कॉलनी येथून मेट्रोने प्रवास करत होत्या आणि सिताबर्डी इंटरचेंज मेट्रो स्थानकावरून वैष्णोदेवी चौक कडे जाणार होत्या. सिताबर्डी इंटरचेंज येथे उतरून प्लॅटफॉर्म बदलताना, प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वरील लिफ्ट क्रमांक ४ जवळ त्यांच्या हातातील ३.५ तोळे वजनाचा सोन्याचा ब्रेसलेट नकळत खाली पडला. पुढील प्रवासासाठी मेट्रोत चढताना त्यांना दागिना हरवल्याचे लक्षात आले. त्या त्वरित चिंतीत झाल्या आणि आपल्या मुलामार्फत महा मेट्रो नागपूरच्या 'लॉस अँड फाउंड' विभागात तक्रार दाखल केली. तक्रार मिळताच महा मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई सुरू केली.

प्रथम सुरक्षा कर्मचारी व उपस्थित प्रवाशांशी चर्चा करण्यात आली. त्यानंतर त्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यात आले. फुटेज तपासताना असे आढळले की एक नियमित प्रवासी तो ब्रेसलेट उचलताना दिसत आहे. त्याने ते इतर प्रवाशांचे आहे का, याची विचारणा केल्यानंतर ते आपल्या खिशात ठेवले. त्यानंतर तो व्यक्ती पुढील मेट्रोने प्रवास करून निघून गेला. फुटेजच्या आधारे संबंधित प्रवाशाने 'महा कार्ड'चा वापर केल्याचे लक्षात आले. प्रवास नोंदी तपासून त्याचा संपर्क क्रमांक मिळवण्यात आला. मेट्रो अधिकाऱ्यांनी त्याच्याशी संपर्क साधून ब्रेसलेट परत करण्यास सांगितले असता, त्याने तत्काळ होकार दिला.

ब्रेसलेट परत मिळाल्यानंतर महा मेट्रो अधिकाऱ्यांनी सौ. मोहता यांच्याशी संपर्क साधला. त्यांच्या वतीने त्यांची कन्या सौ. प्रीती जैन दागिना स्वीकारण्यासाठी उपस्थित राहिल्या. महा मेट्रोचे महाव्यवस्थापक (ऑपरेशन्स) श्री. सुधाकर उराडे यांच्या हस्ते दागिना योग्य मालकाकडे सुपूर्द करण्यात आला. सौ. जैन यांनी हा मौल्यवान दागिना परत मिळवून देण्यासाठी अतिरिक्त वेळ देऊन मेहनत घेतल्याबद्दल महा मेट्रो व त्यांच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक आभार मानले.

या प्रकरणात महा मेट्रोचे श्री. ए. के. स्वामी (कन्सल्टंट – मेट्रो सुरक्षा), श्री. पवन पाटील (स्टेशन कंट्रोलर), श्री. गणेश गारकळ (वरिष्ठ सुरक्षा निरीक्षक) तसेच इतर अधिकाऱ्यांनी अथक परिश्रम घेऊन हा मौल्यवान दागिना परत मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली.